www.PapaCambridge.com

UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Level

**MARATHI** **9688/02**

Paper 2 Reading and Writing **October/November 2010**

**1 hour 45 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer **all** questions.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You should keep to any word limits given in the questions.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्व प्रथम खालील सूचना वाचा.**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.

उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.

गडद निळ्या अथवा काळ्या शाईच्या लेखणीने लिहावे.

टाचणी अथवा टाचण्याची कोणतीही अन्य साधने, वाक्यांना अधोरेखित करण्यासाठी रंगीत लेखणीचा वापर ,
डिंक किंवा चूक मजकूर खोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शाईचा वापर करू नये.

**सर्व** प्रश्न सोडवा.

उत्तर लिहिण्यासाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

शब्दकोषांचा उपयोग करण्यास मनाई आहे.

प्रश्नात नमूद केलेल्या शब्दसंख्येच्या मर्यादेत उत्तर लिहावे.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावीत.

प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा पोट प्रश्नांच्या शेवटी कंसात [ ] प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.


© UCLES 2010
UNIVERSITY *of* CAMBRIDGE International Examinations
**[Turn over**

www.PapaCambridge.com

## विभाग – 1

**सर्वप्रथम खालील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

विसाव्या शतकातील विमानाच्या शोधामुळे देशोदेशीच्या मुलकी व लष्करी हवाई वाहतुकीच्या क्षेत्रात प्रचंड क्रान्ती घडून आली. त्यापूर्वी सागरी मार्गाने व खुष्कीच्या मार्गाने वाहतूक होत होती. त्यामुळे प्रवाशांचा व तसेच मालाची ने-आण करण्यात फार मोठा कालापव्यय होत असे. शिवाय पाऊस, वादळ, धुके, भूस्खलन यासारख्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागे. विमानें वेगाने आकाशातून उंचीवरून उड्डाण करीत असल्यामुळे नैसर्गिक संकटांना फारसे सामोरे जावे लागत नाही. त्यामुळे अमेरिका, युरोप, जपान, उत्तर धृव व दक्षिण धृव यासारख्या लांब पल्ल्यांच्या देशांतील अंतर कमीतकमी वेळात पार करता येते. शिवाय प्रवासही अधिक सुकर व सुरक्षित झाला आहे.

हवाई वाहतुकीमुळे कधी नव्हे एवढे जगातील देश जवळ आले. आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासामुळे विमानांच्या वाहतुकीचे जाळे जगभर विणले गेले. आंतर्देशीय व मुलकी अशा दोन्ही क्षेत्रातील हवाई वाहतुकींना चांगले दिवस आले. जगातल्या देशांचा परस्परांशी संबंध येऊन व्यापारी व सामरिक उलाढाली वाढल्या, देशांच्या आर्थिक विकासाला चालना मिळाली. पर्यटन व्यवसाय, व्यापार-उदीम, सामाजिक, राजकीय, आर्थिक व लष्करी उलाढाली यामुळे विमान प्रवासाची मागणी उत्तरोत्तर वाढत आहे. सप्टेंबर २००७ मधे झालेल्या एका सर्वेक्षणातून असे आढळून आले की, जगातील सर्व देश मिळून एका वर्षात विमानांच्या उड्डाणांची संख्या २.९६ कोटी होती. याचाच अर्थ प्रतिदिन ८०,९८७ उड्डाणे होतात आणि दररोज ९० लाख लोक हवेत असतात. एका वर्षात सर्वाधिक उड्डाणे १.१ कोटी एकट्या अमेरिकेत होतात. सर्वाधिक व्यस्त मार्ग बार्सिलोना (स्पेन) व माद्रिद (स्पेन) या मधील आहे. तिथे आठवड्याला ९७१ उड्डाणे होतात. दुसऱ्या क्रमांकावर ब्राझील देशातील साओपावलो ते रि-ओडी-जानेरो मार्ग असून दर आठवड्याला ८९४ उड्डाणे होतात. तिसऱ्या क्रमांकावर दक्षिण कोरियातील जेजू ते सिओल हा मार्ग आहे. तेथून आठवड्यात ८५८ उड्डाणे होतात.

विमानांचा फार मोठा उपयोग युद्धाच्या व शांततेच्या काळातही होतो. पहिल्या व दुसऱ्या जागतिक महायुद्धात विमानांनी केलेली कामगिरी लक्षणीय ठरली. युद्धात लष्करी कारवाई तातडीने करून युद्धाचा शेवट लवकर घडवून आणण्यात विमानांनी सिंहाचा वाटा उचलला. युद्धभूमीवर शस्त्रास्त्रे, दारूगोळा, अन्न पुरवठा, औषधी पुरवठा, सैनिकांची कुमक पोहचवणे, जखमी लोकांना हलविणे यासारखी महत्त्वाची सेवा विमान वाहतुकीमुळे शक्य झाली.

शांततेच्या काळात विमान वाहतुकीचे कार्य मोलाचे ठरते. देशोदेशीचे समाजकारणी, राजकारणी, अर्थशास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षणतज्ञ यांच्यात वैचारिक देवाण-घेवाण होते. शांततेच्या मार्गाने सर्व देशांचा विकास घडवून आणण्यात ते प्रयत्नशील असतात. जागतिक शांतता, स्थैर्य, विकास, समान संधी याबरोबरच रंग, वंश, वर्ण, धर्म व संप्रदाय यांच्या पलीकडे असणारी मानवी संस्कृती घडवून आणण्याचे प्रयत्न करणे आज शक्य झाले आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळातही माणसांना वाचवण्याचे प्रयत्न हवाई वाहतुकीमुळे शीघ्रतेने करता येऊ लागले. त्यामुळे जगातील सर्व देश आज माणुसकी, प्रेम व परस्पर सहकार्याच्या दिशेने वाटचाल करताना दिसतात.

www.PapaCambridge.com

1 **खाली दिलेल्या शब्दांचे अर्थ सांगून त्याचा तुमच्या वाक्यात उपयोग करा.**

(i) कालापव्यय

(ii) पल्ला [1]

(iii) सुकर [1]

(iv) सामरिक [1]

(v) लक्षणीय [1]

2 **खाली दिलेल्या संकल्पना वरील उताऱ्यात आल्या आहेत. त्यांचा अर्थ स्पष्ट करून लिहा.**

उदाहरण - क्रान्ती घडणे

उत्तर - फार मोठे परिवर्तन अकस्मात घडून येणे

(i) सामोरे जावे लागणे. [1]

(ii) देश जवळ येणे. [1]

(iii) चांगले दिवस येणे. [1]

(iv) सिंहाचा वाटा. [1]

(v) कुमक पोहोचवणे. [1]

3 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. उताऱ्यातील वाक्ये वा शब्द उत्तरात नसावी. अन्यथा गुण कमी केले जातील.**

**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**

**एकूण गुण 15 + 5 = 20**

(i) सागरी व खुष्कीच्या मार्गाने होणाऱ्या वाहतुकीला कोणत्या अडचणींशी सामना करावा लागतो ? [2]

(ii) विमानाचा प्रवास हा सुरक्षित का झाला ? कोणतीही तीन कारणे लिहा. [2]

(iii) विमानाने प्रवास करण्याची मागणी का वाढली ? [2]

(iv) विमानांचा उपयोग युद्धाच्या काळात कशा प्रकारे होतो ? [3]

(v) शांततेच्या काळात विमान वाहतुकीच्या सोयीमुळे कोणकोणते फायदे मिळतात ? [3]

(vi) परस्पर देशात सौहार्द निर्माण करण्यात हवाई वाहतुकीचे योगदान स्पष्ट करा. [3]

**एकूण गुण** [20]

www.PapaCambridge.com

## विभाग – 2

**पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा.**

भारतातील उद्योगपती जमशेटजी टाटा यांच्या उद्योग समूहाने भारतात सर्वप्रथम विमान वाहतूक सेवा दुसऱ्या जागतिक महायुध्दाच्या पूर्वी सुरू केली. या खासगी कंपनीची ही देशांतर्गत असलेली पहिली प्रवासी विमान सेवा होती. मुलकी हवाई सेवा असल्यामुळे सुरुवातीच्या काळात तिचा विस्तार फार मोठा नव्हता. भारतातील मुंबई, दिल्ली, कलकत्ता, चेन्नई, अहमदाबाद, बंगळूर व जमशेटपूर यासारख्या महत्त्वाच्या शहरांशी ती जोडली होती. १९३९ च्या दुसऱ्या महायुध्दाच्यावेळी तिचा विस्तार होऊ लागला. हळूहळू हवाई वाहतुकीचे जाळे सर्वत्र पसरू लागले. १५ ऑगस्ट १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारतातल्या राज्यकर्त्यांनी, स्वतंत्र देशात स्वत:ची हवाई सेवा असावी या हेतूने 'टाटा एअर लाईन्स' चे सरकारीकरण करून 'एअर इंडिया' व 'इंडियन एअरलाईन्स' अशा दोन हवाई सेवा अनुक्रमे आंतर्देशीय व देशांतर्गत पातळीवर सुरू केल्या.

आज भारतातील विमान सेवा जगातल्या बहुसंख्य देशाशी जोडली गेली आहे. ज्या ज्या देशात भारतीय मूळ वंशाचे लोक स्थायी झालेत त्या त्या देशांशी भारतीय विमान सेवा अग्रक्रमाने सुरू करण्यात आली. त्यामुळे मॉरिशस, फिलीपिन्स, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड व पूर्व आशिया खंडातील देशांशी हवाई वाहतुकीने संपर्क साधण्यात आला. तसेच हळूहळू देशातील लहान मोठ्या शहरांशीही विमान वाहतूक जोडण्यात आली. जागतिकीकरण व खुली अर्थव्यवस्था यामुळे हवाई वाहतुकीद्वारे आयात-निर्यात व्यापारालाही चालना मिळत आहे. जगातल्या जवळ जवळ सर्व लहान मोठ्या देशांशी भारताचा व्यापार-उद्योग वाढला आहे. देशातील सर्वाधिक आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणे मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज विमान तळावरून होतात. दुसरा क्रमांक दिल्लीच्या इंदिरा गांधी विमान तळाचा आहे. मुंबई ते दिल्ली दरम्यान दर आठवड्याला ७४२ विमान उड्डाणे होतात. व्यापारासाठी, शिक्षणासाठी, सरकारी कामकाजासाठी, नोकरीसाठी, संशोधनासाठी वा इतर अनेक कारणांसाठी देशातील लोकांना विमान प्रवास करावा लागतो. हवाई वाहतुकीची मागणी वाढत चालल्यामुळे अलिकडे खासगी विमान कंपन्यांचाही उड्डाण क्षेत्रातील सहभाग वाढला आहे.

देशातील हवाई वाहतुक क्षेत्राचा विकास दर १५ टक्के आहे. प्रगतिपथावर असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेत हवाई वाहतुक आणि त्यासाठीच्या पायाभूत सुविधा उत्तम असणे आवश्यक आहे. सध्या भारतात दिवसाला ५ हजार उड्डाणे होतात. त्यासाठी नियोजनाची आवश्यकता आहे. हवाई वाहतुक नियंत्रणेत अनेक अडथळे आहेत. आधुनिकदृष्ट्या सर्व सुख सोयींनी परिपूर्ण अशा विमानतळांची उभारणी करावी लागेल. त्यासोबत रडार यंत्रणेची व्याप्ती वाढविणे, दिग्दर्शनाची आणि विमान धावपट्टीवर उतरविण्याची पध्दती अधिक अचूक करणे, माहितीची देवाण-घेवाण करणारी यंत्रणा स्वयंचलित करणे, नियंत्रकांच्या त्रुटीवर मार्ग काढणे, वेळेत उड्डाणासाठी बंधने घालणे आणि मुलकी व लष्करी हवाई वाहतूकीत समन्वय साधणे यासाठी उपाययोजना कराव्या लागतील. या साऱ्या अडचणींवर गांभीर्याने विचार करण्याचा प्रयत्न अग्रक्रमाने होत आहे. प्रगतिपथावर असलेल्या भारतीय वाहतुकीसाठी पायाभूत सुविधा उत्तम असणे आवश्यक झाले आहे.

www.PapaCambridge.com

4 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वा**
**उत्तरात नसावी. अन्यथा गुण कमी केले जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** भारतात पहिली विमान सेवा कोणी व केव्हा सुरु केली ? [2]

**(ii)** भारत स्वतंत्र झाल्यानंतर राज्यकर्त्यांनी विमान वाहतुकीच्या बाबतीत कोणता निर्णय घेतला व का ? स्पष्ट करा. [3]

**(iii)** भारताने अन्य देशांशी संपर्क साधताना कोणकोणत्या देशांना अग्रक्रम दिला व का ? सविस्तर लिहा. [3]

**(iv)** जागतिकीकरणामुळे भारतीय विमान वाहतुकीला कोणकोणते फायदे मिळाले ? [3]

**(v)** भारतातील विमान वाहतुकीत कोणकोणत्या पायाभूत सुविधा करण्याची गरज भासते ? [4]

**एकूण गुण** [20]

5 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. दोन्ही प्रश्नांची उत्तरातील एकूण शब्दसंख्या 140 पर्यंत असावी. उत्तरे स्वत:च्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये नसावीत.**
**अन्यथा गुण कमी केले जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** वरील दोन्ही उताऱ्यांच्या आधारे आंतरराष्ट्रीय व देशांतर्गत विमान वाहतुकीचे महत्त्व समजाऊन सांगा. [10]

**(ii)** तुमच्या देशातील विमान वाहतुकीवर प्रकाश टाका. [5]

**एकूण गुण** [20]

BLANK PAGE

www.PapaCambridge.com

BLANK PAGE

www.PapaCambridge.com

**BLANK PAGE**

www.PapaCambridge.com

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of